सोमवार, दि. १ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## ज्येष्ठा गौरी पूजन आणि महालक्ष्मी स्थापना



सुरेंद्र हेमंत ठाकूर यांच्या घरी ज्येष्ठा गौरीच्या मने भावे पूजा करून स्वागत करण्यात आले व महालक्ष्मीची स्थापना करण्यात आली. (छायाचित्र - किरण खानापुरे)

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरातील गणपती गल्ली परिसरात आज भक्तिभावाच्या वातावरणात ज्येष्ठा गौरीचे आगमन आणि पूजन पार पडले. स्थानिक रहिवासी सुरेंद्र हेमंत ठाकूर यांच्या घरी अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने गौरीचे स्वागत करण्यात आले. या सोबतच महालक्ष्मीची स्थापनाही धार्मिक विधीपूर्वक करून भक्तांनी गणेशोत्सवातील आणखी एक महत्त्वाचा सोहळा साजरा केला. ठाकूर कुटुंबाच्या घरी मंगल वातावरण निर्माण झाले होते. मंत्रोच्चारांच्या गजरात ज्येष्ठा गौरींची प्रतिष्ठापना करण्यात आली. महिलांनी पारंपरिक वेषभुषेत मंगलागौर गीते गात घरातील वातावरण अधिक पवित्र आणि उत्साही केले.

गौरी पूजनादरम्यान कुमकुम, अक्षता, नारळ, हळद आणि फुलांच्या सड्यांनी सजवलेल्या पारंपरिक सजावटीत देवतेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महालक्ष्मीची स्थापना करत देवीचे आराधन करून कुटुंबाने घरासाठी सुख, समृद्धी आणि शांततेच्या आशीर्वादाची प्रार्थना केली. या पूजेसाठी परिसरातील शेजारी, नातेवाईक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. महिलांनी पारंपरिक हळदीकुंकू समारंभ आयोजित करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या. गणपती गल्लीतील हा कार्यक्रम स्थानिक सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरला. पूजेच्या निमित्ताने परिसरातील विविध समाजघटक एकत्र आले आणि एकत्रित सण साजरी करणाची परंपरा पुन्हा अधोरेखित झाली. गौरी आणि महालक्ष्मी पूजन हे समृद्धी, सौभाग्य आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानले जाते. घरातील महिलांनी गौरीदेवीला उखाणा घेत आरत्या अर्पण केल्या, गणेशोत्सवात ज्येष्ठा गौरी आणि महालक्ष्मी पूजनाला विशेष महत्त्व आहे. ठाकूर कुटुंबाने या प्रसंगी परिसरातील नागरिकांना प्रसाद वाटप केले.

# टेंभुर्णीत बाहेरच्या कुत्र्यांचा हैदोस

## बंदोबस्त करण्याची टेंभुर्णीकरांची मागणी

**विशाल देशमुख**



**टेंभुर्णी** - गावात सध्या कुत्र्याची मोठी दहशत निर्माण झाली असून नागरिकांत मोठी भीती निर्माण झाली आहे. या पासून लहान लहान मुले विद्यार्थी यांना मोठी भीती वाटत असल्या मुळे त्यांना शाळेत किंवा काही सामान घेऊन येण्याची भीती वाटत आहे.या पासून होणाऱ्या अडचणीत सातत्याने वाढ होत असून याचा लवकर निर्णय घेण्याची विनंती गांवकरी आणि होणारे त्रास धारक करत आहे. हा भटक्या मोकाट आणि खतरनाक कुत्र्यापासून सगळेच परेशान असून या मोकाट कुत्र्यांपासून शाळेचे विद्यार्थी परेशान कोंबडीचे विष्ठा खाऊन भरभक्कम झालेल्या कुत्र्यामुळे शेतात जाणारे महिला मंडळ परेशान गावात कोणी तरी बाहेरून आणून सोडलेल्या कुत्र्या मुळे होणाऱ्या त्रासामुळे गांवकरी परेशान कुठे ही झुंड करून बसल्यामुळे रहदारीच्या येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची अडचण वाढली असून या मुळे वाहन धारक ही अडचणीत आलेले असल्याचे दिसून आले आहे.

या कुत्र्याचा बंदोबस्त करणार कोण अशा प्रश्न निर्माण झाला असून येथील ग्रामपंचायत आणि पोलिस प्रशासन सह येथील पुढारी यांनी या कडे लक्ष घालून ही हैदोस करणाऱ्या कुत्र्याचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरून थंडी होऊन आता पुन्हा जोर धरत आहे.

विशेष म्हणजे टेंभुर्णी कडे येणाऱ्या वातावरती असल्या प्रकारे घाण पडलेल्या मुळे दुर्गंधी असल्या मुळे बऱ्याच आरोग्याला आमंत्रण भेटल्याचे काम होत असल्याने आजार वाढण्याचे ही शक्यता निर्माण झाली आहे. या सर्व बाबीवर सोशल मीडियावर बरीच मंडळी आप आपल्या परीने मेसेज टाकत या बाबत न्याय मागत असून ग्रामपंचायत आणि पोलिस यांनी लक्ष देऊन ही समस्या निकाली काढण्याची मागणी करत आहे.

## वातावरण थंड ठेवा- जरांगे पाटील

**मुंबई** - फडणवीस साहेब वातावरण थंड ठेवा. पोलीस आमच्या गाड्या अडवत आहेत. आम्ही गावात गेलो तर तुमच्या आमदारांना राज्यात थांबू देणार नाही. राज्यात तुमच्या आमदार खासदारांची अवस्था वाईट होईल असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पान ३ वर

# जलाशय संवर्धन व उध्वस्त सांडव्याबाबत मुख्यमंत्र्यांना भेटणार-खा. डॉ. काळे

## नदीपात्रातील अतिक्रमणे, प्रदूषण व विविध मुद्द्यावरील संवाद सत्र



**जालना । प्रतिनिधी** - कित्येक वर्षापासून जालना शहरासाठी वरदान ठरत असलेल्या घाणेवाडी तलाव अर्थात संत गाडगेबाबा तलावाचे संरक्षण आणि संवर्धन होणे अत्यंत महत्त्वपूर्ण असून, उध्वस्त झालेले दोन्ही सांडवे अत्यंत गंभीर बाब आहे. हाताला कधीही फुटण्याची व्यक्त करण्यात येत असलेली भीती विचारात घेता, यात लक्ष घालण्याबाबत आपण नूतन जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. एवढ्यावरच न थांबता थेट मुख्यमंत्र्यांना भेटून गांभीर्य लक्षात आणून दिले जाणार असल्याचे खा. डॉ. कल्याण काळे यांनी सांगितले. जालना शहरासह जिल्ह्याच्या कायापालट करण्यासाठी आपणा सर्वांना हातात हात घालून वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर जाऊन काम करावे लागेल, प्रशासकीय कामांसाठी दबाव गट तयार करावा लागेल, अशी साद घालत, यासंदर्भात प्रत्येक महिन्याला बैठक घेऊन विचार मंथन करून पुढील दिशा ठरवली जाणार असल्याचे ते म्हणाले.

जालना शहरातील पाणीटंचाई, पर्यावरण, दुरवस्था झालेल्या संत गाडगेबाबा जलाशयाचे संवर्धन, कुंडलिका सीना नदी पुनरूज्जीवन तसेच पर्यावरण संरक्षणार्थ (हरित क्षेत्र विकसित करणे) चर्चा, प्रारूप आराखडा नियोजन व इतर विषयांबाबत खा. काळे यांनी शनिवार दि. ३० ऑगस्ट रोजी आयसीटी कॉलेजच्या सभागृहात ५० सेवाभावी संस्थांसह व्यापारी, उद्योजकांशी संवाद साधला. व्यासपीठावर महिकोचे चेअरमन राजेंद्र बारवाले, संचालक समीर अग्रवाल, कलश सीड्सचे व्यवस्थापकीय घाणेवाडी पान ३ वर

## तालुका पातळीवरही नदीजोड प्रकल्प व्हावेत - शिवरतन मुंदडा

शिवरतन मुंदडा म्हणाले की, घाणेवाडी जलसंरक्षण मंचाशी प्रत्येक नागरिक जुडला गेल्यानंतर नदी संवर्धनाचे काम हाती घेण्यात आले. निसर्ग पूर्वीप्रमाणेच आहे. फक्त पडणाऱ्या पावसाचे पाणी साठविणे आणि जमिनीत जिरविणे गरजेचे आहे. जिल्ह्यात २३६ कोल्हापुरी बंधारे आहेत. खोलीकरणही होत आहे. मात्र, लोखंडी दरवाजे चोरीला जात असल्याने पाणी वाहून जाते. यावर पर्याय म्हणून दरवाजांऐवजी दोन ते अडीच मीटर उंच भिंत उभी केल्यास ही समस्या मार्गी लागू शकते. तालुकास्तरावर देखील नदीजोड प्रकल्प हाती घ्यावा यासाठी, खा. कल्याण काळे यांनी लक्ष घातल्यास ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पाणी पातळी वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## युवा आदर्श

### मूळ विषय ...

**श्वान विषय सध्या**
**घालू लागे धुमाकूळ**
**निमित्ते कळून आले**
**कुणाचे काय कूळ**
**मुखशुद्धी करायची**
**आपणही भरा चूळ**
**बोल जाऊ द्या वाया**
**भले पाणी ते मचूळ**
**भूत दया फिरे मुक्त**
**डोळ्यां पडे भारुळ**
**साखरे सारखा भाव**
**भरे मुंग्यानी वारुळ**
**घेरायचे प्रतिपक्षाला**
**वादाचे करुन वर्तुळ**
**वाजे आपली टिमकी**
**असू दे पदार्थ वातुळ**
**लग्नात बदलता रुप**
**अक्षता होती तांदूळ**
**विषयास चढव रंगत**
**जमेल भोवती गोकुळ**
**भरकट होता विवादा**
**समस्या विसरेल मूळ**
**निर्णय घेई निर्णायक**
**नाय नाट करा समूळ**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## टेंभुर्णी फिडरवर दुसऱ्या खेड्याचा अतिरिक्त लोड वाढवू नका

### व्यापारी महासंघाची मागणी

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - पाऊस आणि विज यांचे नक्कीच छतीसचां आकडा आहे असेच म्हणावे लागेल त्यात टेंभुर्णी सगळ्या कामाला येणारी अडचणीचे गाव म्हणून प्रसिद्ध असून जाफ्राबाद तालुक्यातील जवळपास २० हजार लोकसंख्या असलेले टेंभुर्णी हे शहर तालुक्यातील मोठी बाजार पेठ असुन,येथे आरामाशिन,पिठाची गिरणी, लाकूड फर्निचर, वेल्डिंग वर्कशॉप यांच्या सह सगळ्या दुकानात लाईट शिवाय होत नाही अशीच परिस्थिती आहे. अनेक व्यावसायिक आपले छोटे मोठे व्यवसाय करून वेळेवर वीजबिल भरत आपला उदरनिर्वाह करत आहे.



टेंभूर्णी शहरात वीजेच्या बाबत अनेक समस्या भेडसावत असतांना, दुष्काळात तेरावा महिना या म्हणीप्रमाणे त्यात भर म्हणजे टेंभुर्णीला आजू बाजूच्या काही गावाचा लोड टाकून पुन्हा अडचणीत डाव रचला जात असल्याचे काही स्थानिकांच्या लक्षात आल्याने, हा डाव उधळून टाकन्यासाठी, टेंभूर्णी स्थानिक पान ३ वर

# आराधनेतून समाजात ऐक्य, बंधुता आणि सकारात्मकतेचा संदेश - प्रा. डॉ. भक्त

## काद्राबादचा सम्राट श्री श्रेय गणेश मंडळात भक्तीभावाने आरती



**जालना । प्रतिनिधी** - गणरायाच्या आराधनेतून समाजात ऐक्य, बंधुता आणि सकारात्मकतेचा संदेश जातो असे प्रतिपादन शिवसेनेचे शहरप्रमुख प्रा. डॉ. पै. आत्मानंद भक्त यांनी येथे केले. ते शहरातील नळगल्ली परिसरातील प्रसिद्ध काद्राबादचा सम्राट श्री श्रेय गणेश मंडळात आयोजित आरती निमित्ताने आले होते. या आरतीसाठी स्थानिक पातळीवरील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि शिवसेनेचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

यावेळी माजी नगरसेवक संतोष जांगडे, सुनील नंद, सेवक नारियलवाले, राजू खडके, प्रकाश पवार, विकास क्षीरसागर, रवी क्षीरसागर, यश जोडीवाले, पप्पू खडके, राज सुरासे, तनुज मिसाळ, ओम खडके, ओमकार मिसाळ, विराज दायमा आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

शहरप्रमुख प्रा. डॉ. आत्मानंद भक्त यांनी यावेळी बोलताना सांगितले की, गणरायाच्या आराधनेतून समाजात ऐक्य, बंधुता आणि सकारात्मकतेचा संदेश जातो. नळगल्लीतील श्री श्रेय मंडळाने गेली अनेक वर्षे भक्तिभावाने गणेशोत्सव साजरा करून शहरात आदर्श निर्माण केला आहे. गणरायाच्या आशीर्वादाने सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक ऐक्य व लोकहिताच्या कार्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक उपक्रम, जसे की रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, तसेच विद्यार्थ्यांसाठी मोफत शैक्षणिक साहित्य वितरण अशा विविध योजना राबविण्याच्या सुचना डॉ. भक्त यांनी यावेळी केल्या.

आरतीच्या वेळी मंडळ परिसरात शेकडो भाविकांनी दर्शन घेतले. गणरायाच्या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. सजावट आणि आकर्षक प्रकाशयोजना करून गणेशमंडळाची शोभा वाढवली. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष आणि कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. भाविकांच्या गर्दीमुळे परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक युवकांनी उत्साहात सहभाग घेतला होता. ही आरती संपन्न होताच गणरायाच्या जयघोषांसह आरतीचा सोहळा संपन्न झाला.

संपादकीय

## वाहतूक कोंडी मोठी समस्या

रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी ही सध्याची मोठी समस्या बनली आहे. दिवस असो की रात्र, वेळ कोणतीही असो रस्ता कोणताही असो मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई किंवा मुंबईतून कुठेही जाणारे राज्य - राष्ट्रीय महामार्ग सगळीकडे प्रचंड वाहतूक कोंडी दिसते. पूर्वी हे चित्र शनिवार, रविवार किंवा जोडून सुट्ट्या आलेल्या दिवशी व्हायची आता ती रोजच होती. या वाहतूक कोंडीने रस्त्यांवर वाहनांच्या रांगाच्या रांगा लागलेल्या असतात त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. ज्या प्रवासास पूर्वी एक ते दीड तास लागायचा त्याच प्रवासासाठी नागरिकांचा आता दुप्पट वेळ लागत आहे. सकाळ, संध्याकाळ यासारख्या पीक अवरमध्ये तर वाहने अगदी कासव गतीने धावतात. वाढत्या वाहन कोंडीमुळे शहरातील नागरिक त्रस्त आहे. ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शासनाने उड्डाणपूल केले पण आता त्याच उड्डाणपुलावर वाहनांची कोंडी होताना दिसत आहे. अनेक प्रयत्न करूनही वाहतूक कोंडी कमी करण्यात प्रशासनाला यश येत नाही. वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील मुख्य कारण आहे ते म्हणजे वाहनांची वाढती संख्या. वाढत्या वाहतूक कोंडीला वाहनांची प्रचंड संख्या जबाबदार आहे. आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. दरवर्षी त्यात हजारो वाहनांची भर पडते. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहे. वाढत्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली तशीच पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात परिणामी अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे. पार्किंगची सोय नसल्याने नागरिक रस्त्यांच्या कडेला आपल्या गाड्या पार्क करतात त्यामुळेही वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शासन, प्रशासनाकडून नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याच्या सूचना दिल्या जातात. मात्र नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. नवीन वाहन विकत घेऊन नागरिक आपल्या खाजगी वाहनांनी प्रवास करत आहे. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना चांगली सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाने जर या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्या तर नागरिक स्वतःच्या वाहनांनी प्रवास न करता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी होईल आणि वाहनाची संख्या कमी झाली की रस्त्यांवरील वाहतूक कोंडी देखील कमी होईल. जर रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्याची शासन प्रशासनाची मनापासून इच्छा असेल तर त्यांनी आधी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करूनच वाहतूक कोंडी रोखता येईल.

**श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था : सारथी

राज्यातील प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण व शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने २०१९ पासून 'सारथी' ही संस्था सुरू केली आहे. मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था म्हणून 'शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती' या बोधवाक्याखाली छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ही संस्था शिक्षण, मार्गदर्शन, कौशल्यविकास, रोजगार, उद्योजकता, संशोधन आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन या सर्व क्षेत्रांत ६३ विविध उपक्रम राबवत आहे.

सारथी संस्थेमधील सन २०२१-२२ ते २०२४-२५ एकूण चार वर्षांमध्ये ८ लाख ३८ हजार ४७७ लाभार्थ्यांनी सहभाग घेतला असून अनेक विद्यार्थी या संस्थेमार्फत मार्गदर्शन घेऊन विविध क्षेत्रात यश संपादन करत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि मार्गदर्शनावर आतापर्यंत ६४७ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. सारथी संस्थेमधील विद्यार्थी दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये निवडून येण्याचा नवीन उच्चांक निर्माण करत आहेत.

**शैक्षणिक संधी व शिष्यवृत्ती योजना**

सारथी मार्फत विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण, मुलाखतीची तयारी, मार्गदर्शन यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. सारथीच्या स्थापनेपासून २०२० ते २०२४ या कालावधीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षेमध्ये ११२ विद्यार्थी निवडून शासनामध्ये सेवा बजावत आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामध्ये २०२० ते २०२३ या कालावधीत १०४८ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले असून वर्ग एक मध्ये २२९ तर वर्ग दोन मध्ये ८१९ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

**कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम**

सारथी मार्फत राबविण्यात येणारा छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम हा महाराष्ट्र राज्यातील सर्व तालुकास्तरावर राबवण्यात येतो. या योजनेमध्ये कालानुरूप विविध अभ्यासक्रम शिकवले जातात. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत एक लाख २० हजार लाभार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार होते, त्यापैकी ९७ हजार २८६ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून ३४ हजार ३०४ लाभार्थ्यांनी आपले प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यापैकी ७३६५ लाभार्थ्यांना नोकरी मिळाली असून ९४१८ लाभार्थ्यांची मुलाखत प्रक्रिया सुरू आहे. सध्या महाविद्यालयांमध्ये १७ हजार २५१ लाभार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

**श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी इंडो जर्मन टूल रूम कौशल्य प्रशिक्षण उपक्रम**

या उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजी नगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर येथे आयटीआय, पदविका व अभियांत्रिकी पदवी प्राप्त १०१२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यापैकी ६५७ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून ३१४ विद्यार्थ्यांना नोकरी लागली आहे.

**परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना**

महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये एकूण ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना आज अखेर एकूण सहा कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती रकमेचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेअंतर्गत एकूण ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सन २०२५ करिता ७५ जागांसाठी दिनांक १६ जून २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते, यामध्ये निवड प्रक्रिया सुरू आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती**

देशातील नामवंत २०० विद्यापीठात शिकणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येते. यामध्ये शिक्षण शुल्क, लायब्ररी शुल्क, परीक्षा शुल्क, वसतीगृह शुल्क व भोजन शुल्काची १०० टक्के रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये या योजनेअंतर्गत ४४१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन पाच कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेसाठी २७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या योजनेसाठी मार्च २०२५ अखेर सहा कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

**उदयोन्मुख कृषी औद्योगिक क्षेत्रातील शैक्षणिक संधी शैक्षणिक शुल्क प्रतिकृती योजना**

वसंतदादा साखर संस्था, पुणे येथील इंडस्ट्रियल फर्मिनेशन अँड अल्कोहोल टेक्नॉलॉजी (खऋढ) आणि थळपश ईशुळपस रपव श्रलेहेश्र ढशलहपेश्रेसू (थइढ) विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना असून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना १०० टक्के शैक्षणिक शुल्क रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. खऋढ मधील एकूण ८० विद्यार्थ्यांना ४९.४० लाख व WBT मधील एकूण २८ विद्यार्थ्यांना ३४.५४ लाख रूपये शैक्षणिक शुल्क अदा करण्यात आले. यापैकी २०२२-२३ मधील पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण सात विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

**शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी**

सेनापती धनाजी जाधव सारथी शेतकरी ड्रोन पायलट प्रशिक्षण योजनेमध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये ३३० शेतकऱ्यांनी ड्रोन पायलट प्रशिक्षण पूर्ण केले आहे. शेतकरी मावळा सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण अंतर्गत मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये वार्षिक लाभार्थी ५०० असून २०२५ पासून हे प्रशिक्षण सुरू झाले आहे. पशुधन संगोपन व मुरघास निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वर्षभरात एक हजार लाभार्थ्यांना उरळी कांचन येथील बायफ या संस्थेमार्फत ३० दिवसीय निवासी प्रशिक्षण, ६० दिवसीय प्रक्षेत्रिय प्रशिक्षण ८९ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

**कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम**

महाराणी सईबाई सारथी रोजगार व स्वयंरोजगार कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम पुणे, वाशिम, कोल्हापूर, गडचिरोली, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, नागपूर, नाशिक, पालघर, बीड, रत्नागिरी या जिल्ह्यात राबवला जातो. या सर्व जिल्ह्यांत एकूण १४१९ अभ्यासक्रम राबविले जात असून त्यापैकी ९८९ अभ्यासक्रम पूर्ण झालेले आहेत. सरदार सूर्याजी काकडे सारथी वाहन चालक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आय.डी.टी.आर. भोसरी पुणे येथे हलकी व जड वाहने चालवण्याचे ३० दिवसाचा प्रशिक्षण देण्यात येते. सन २०२५ मध्ये या प्रशिक्षणास सुरुवात झाली असून आत्तापर्यंत ४९ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सरसेनापती हंबीरराव मोहिते सारथी मोडी लिपी प्रशिक्षण योजनेअंतर्गत २६० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय करियर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिरामध्ये सन २०२२ पासून ते २०२५ मध्ये १९ हजार १९१ विद्यार्थ्यांनी करिअर मार्गदर्शनाचा लाभ घेतला आहे.

**निबंध स्पर्धाचे आयोजन**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज तालुकास्तरीय निबंध स्पर्धा योजनेमध्ये इयत्ता तिसरी ते पाचवी विद्यार्थी व इयत्ता सहावी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेत सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत तीन लाख १६ हजार ५९२ इतके विद्यार्थी सहभागी झाले असून त्यापैकी ९४४४ इतक्या विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त केले आहे. या स्पर्धांसाठी १७ लाख ९३ हजार रुपयांची पारितोषिक ठेवण्यात आली होती.

**छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती**

आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळविण्याच्या दृष्टीकोनातून ही योजना राबविली जाते. छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ पासून ते २०२३ पर्यंत ३०७८ विद्यार्थी योजनेसाठी पात्र होते. त्यापैकी ३९४ विद्यार्थ्यांनी पीएचडी पूर्ण केली असून १०३ विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

**सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास कार्यक्रम**

सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत इनक्युबेशन हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून स्टार्टअप कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व विद्यावेतन स्वरूपात आर्थिक साहाय्य दिले जाते. महाराष्ट्रातील शासनमान्य यादी पैकी १३ इनक्युबेशन केंद्राने सारथी संस्थेबाबत सामंजस्य करार केला आहे. सारथीमार्फत लाभार्थ्यांना एक वर्षासाठी इनक्युबेशन केंद्राकडे प्रायोजित केले जाते. सन २०२५ या वर्षी १२० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे.

**सर्व सोयी-सुविधायुक्त छत्रपती शिवाजी महाराज संकुल**

सारथी संस्थेमार्फत पात्र विद्यार्थ्यांना प्राधान्याने सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज संकुल उभारण्यात येत आहेत. या इमारत बांधकामासाठी शासनाने मोफत जमिनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. प्रत्येक संकुलामध्ये ५०० मुलांचे वसतीगृह, ५०० मुलींचे वसतीगृह, ३०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, सारथी विभागीय कार्यालयांचा समावेश आहे. सारथीच्या पुणे येथील मुख्यालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून नवीन इमारतीमध्ये प्रशासकीय कामकाज सुरू झाले आहे. इतर विभागीय कार्यालयाची कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर ती पूर्ण करण्यात येत आहेत. विभागीय कार्यालय पुणे, सारथी उपकेंद्र कोल्हापूर, विभागीय कार्यालय खारघर नवी मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, सारथी उपकेंद्र लातूर, विभागीय कार्यालय नागपूर, अमरावती यासाठी आठ जिल्ह्यात वसतिगृह, अभ्यासिका, कौशल्य विकास केंद्रे उभारण्यात येणार आहेत.

**सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना**

सारथी मार्फत सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना राबवण्यात येत असून यामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यकाळातील प्रकाशित कागदपत्र, आदेश, हुकूमनामा इत्यादी दस्तऐवज पुराभिलेख संचालनालयाकडून डिजिटल स्वरूपात प्राप्त केले आहेत. या ऐतिहासिक दस्तऐवजाच्या विषयावर पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. सारथी संस्थेमार्फत शिवराज्याभिषेक अभियान, किल्ले संवर्धन, वृक्षारोपण, जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. यामध्ये पीएचडी करणाऱ्या १०८६ विद्यार्थ्यांनी एक लाख १८ हजार ८३४ सीड बॉल तर अधिकारी कर्मचारी यांनी १३ हजार ६०० सीड बॉल तयार केले. हे सीड बॉल २०२४ मध्ये ७५ किल्ल्यांच्या परिसरात टाकण्यात आले. सरदार शिरोजी इंदलकर सारथी किल्ले संवर्धन अभियानांतर्गत ३८ किल्ले व दोन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांच्या परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये ८५८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. चावडी वाचन अभियानामध्ये पाच हजार विद्यार्थ्यांद्वारे ग्रामसभांमध्ये योजनांची माहिती प्रसारित करण्यात आली आहे.

**सारथी ची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम**

सारथीच्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी सारथीचे संकेतस्थळ https://www.sarthi-maharashtragov.in/, सारथी अँड्रॉइड एप्लीकेशन https://play.google.com/store/apps/details?id=com.srthinew, फेसबुक पेज facebook.com/sarthimaharashtra, यूट्यूब चॅनल sarthipune178, इंस्टाग्राम अकाउंट https://www.instrgram.com/sarthi.pune?igsh=MTjob3g5MzNneXdoO== आणि सारथी व्हाट्सप चॅनेल https://whatsapp.com/channel/0029VaELiPmJUM2hyekQ6R1R सुरू आहे. ज्या द्वारे सारथीच्या योजनांची माहिती सर्वसामान्यांना मिळत आहे. विविध युवा शिबिरे, सारथी दिनदर्शिका वाटप यासारखे उपक्रमातून लाभार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्यात येत आहे.

मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या सारथी संस्थेमुळे हजारो विद्यार्थी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन व शैक्षणिक बळ मिळत आहे. या समाजातील मागास घटकांना सक्षम, स्वावलंबी आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा व नवयुगाची आव्हाने पेलणारा समाज तयार करण्यामध्ये सारथी मोलाची भूमिका बजावत आहे. योग्य शिक्षण, दिशा आणि संधी मिळाल्यास यश मिळवता येते. हे स्वप्न सत्यात उतरवण्याचे काम सारथी संस्था करत आहे. मराठा समाजातील गरजू, होतकरू युवक व युवती या संस्थेच्या माध्यमातून स्पर्धेच्या युगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात यश संपादन करत आहेत. मराठा समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन विकासाच्या प्रवाहात अग्रेसर ठेवणारी सारथी नक्कीच या समाजासाठी एक दीपस्तंभ ठरत आहे.

**संध्या गरवारे- खंडारे, विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# ज्योती आडेकर यांना राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार



**जालना । प्रतिनिधी -** पुणे येथील साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशन यांच्या वतीने अंजनी फाउंडेशनच्या अध्यक्षा ज्योती आडेकर यांना राष्ट्रीय भारत भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. रविवार, २४ ऑगस्ट रोजी पुणे येथे हा सोहळा पार पडला.

विविध सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे अंजनी फाउंडेशन अन्न, वस्त्र, निवारा तसेच शिक्षण, आरोग्य, रोजगार, व्यसनमुक्ती व महिला सक्षमीकरण आदी क्षेत्रात कार्यरत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशनच्या वतीने अंजनी फाउंडेशनला गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक चळवळीत कार्यरत असणाऱ्या व विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचा सन्मान सोहळा, सर्वांच्या सेवेसाठी महाराष्ट्राच्या हितासाठी नवतरुणांनी चालवलेली राज्यव्यापी सामाजिक चळवळ म्हणून सामाजिक चळवळीचा मानबिंदू असलेल्या साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशनच्या वतीने आयोजित राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार हा सोहळा पुण्यात इतिहास संशोधन मंडळ येथे पार पडला.

या सोहळ्यात जालना येथील सामाजिक चळवळीत सक्रिय असलेले अंजनी फाउंडेशनचे संस्थापक पोलिस उपनिरीक्षक बालाजी किरवले, ज्योती आडेकर, विद्या जाधव, शुभम किरवले यांना सामजिक कार्यात भरीव कार्याबद्दल गौरविण्यात आले.

या सन्मानाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रमंडळीकडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून अभिनेते बाळराजे वाळुंजकर, व्याख्याते व प्रबोधनकार विष्णू देशमुख, पोलीस सब इन्स्पेक्टर, अभिनेत्री चित्रा देशमुख, भक्ती साधू, केतकी गावडे, लावण्यवती पूजा माळी, संजय कोटगिरे, हिमांशू जैन, प्रा. सचिन देवरे, आम्रपाली पारवे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आयोजक समितीचे संस्थापक अध्यक्ष सचिन हळदे, संस्थापक अध्यक्ष विकास उबाळे, दिपक उबाळे उपस्थित होते. ॲड. उमाकांत आदमाने यांनी सूत्रसंचालन करत सर्वांचे आभार मानले.

# ज्येष्ठा गौरी

भाद्रपद मासात येणार्या गौरींचे पूजन करून अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया हे व्रत करतात. या व्रतामागील इतिहास आणि सण साजरा करण्याच्या पद्धती विषयी या लेखातून जाणून घेऊया.

तिथी : भाद्रपद शुद्ध अष्टमी.

इतिहास आणि उद्देश : पुराणात अशी कथा आहे, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया श्रीमहालक्ष्मी गौरीला शरण गेल्या. त्यांनी आपले सौभाग्य अक्षय्य करण्याविषयी तिची प्रार्थना केली. श्रीमहालक्ष्मी गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार करून शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना आणि पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले; म्हणून अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात.

व्रत करण्याची पद्धत :


हे व्रत तीन दिवस चालते. प्रांतभेदानुसार हे व्रत करण्याच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये धातूची, मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्री महालक्ष्मीचे चित्र काढून, तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन केले जाते. (महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाच लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुले येणार्या वनस्पतीची रोपे अथवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवतात आणि त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. त्या मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवतात. - ही एक रूढी आहे.)

गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसर्या दिवशी तिची पूजा करून नैवेद्य दाखवतात.

तिसर्या दिवशी गौरीचे नदीत विसर्जन करतात आणि परत येतांना नदीतील थोडी वाळू किंवा माती घरी आणून ती सर्व घरभर पसरवतात.'

अशौच असेल, तर गौरी आवाहन आणि पूजन करू नये : भाद्रपदातील महालक्ष्मीच्या (गौरीच्या) वेळी अशौच असेल, तर गौरी आवाहन आणि पूजन करू नये. अशौचामुळे तेव्हा गौरीपूजन न करता आल्याने काही जण पुढे आश्विन मासात (महिन्यात) गौरीपूजन करतात, पण तसे करू नये. अशा प्रसंगी त्याचा लोप करणे (म्हणजे ते न करणे) युक्त होय.

दोरकग्रहण :



'ज्येष्ठा गौरीच्या पूजेच्या वेळी दोरक ठेवून विसर्जनानंतर तो दोरक घेतला जातो. दोरक घेण्याच्या विधीस 'दोरकग्रहण' असे म्हणतात. दोरक म्हणजे हाताने काढलेल्या सुताचे सोळा पदरी हळदीत भिजवून रंगवलेले सूत्र होय. सोळा ही संख्या लक्ष्मीशी निगडित असल्यामुळे दोरकातही सोळा पदर असतात.

हा दोरक अत्यंत शुभकारक आणि लक्ष्मीप्राप्ती करून देणारा असतो. घरातील सर्व स्त्रिया दोरक धारण करतात. काही प्रांतांत पुरुषही आपल्या हातात हा दोरक धारण करतात. काही जण हा दोरक आपल्या धनकोशात, धान्यकोठारात, वास्तूच्या पायात आणि देवघरात ठेवतात.

ज्येष्ठा गौरीपूजन हा एक कुळाचार आहे. त्यामुळे कोश (मिळकतीचे साधन) आणि चुली (स्वयंपाकघर) निराळे होताच प्रत्येक स्वतंत्र कुटुंबात हे व्रत करणे अत्यावश्यक असते.'

ज्येष्ठा गौरीचे व्रत केल्यामुळे होणारी फलप्राप्ती :

सौभाग्याचे रक्षण होणे

काही वेळा स्त्रिया स्वतःच्या सौभाग्याचे रक्षण होण्यासाठी श्री महालक्ष्मीदेवीला उद्देशून ज्येष्ठा गौरीचे व्रत करतात. त्यामुळे व्रत करणार्या स्त्रियांवर महालक्ष्मीदेवीची कृपा होऊन त्यांच्या सौभाग्याचे रक्षण होते.

ऐहिक आणि पारमार्थिक लाभ होणे

ज्येष्ठा गौरीचे व्रत केल्याने श्री गणेशासह रिद्धी आणि सिद्धी यांचे कृपाशीर्वाद लाभून ऐहिकदृष्ट्या भरभराट होते अन् आध्यात्मिक क्षेत्रात विविध सिद्धींची प्राप्ती होते.

गणेशतत्त्वाचा पूर्ण लाभ होणे

रिद्धी आणि सिद्धी यांसह कार्यरत असणारे गणेशतत्त्व पूर्ण असल्यामुळे ज्येष्ठा गौरीचे व्रत केल्याने उपासकाला गणेशतत्त्वाचा पूर्ण लाभ होतो.

गौरी आणि श्री गणेश यांना प्रार्थना !

'हे गौरी आणि श्री गणेशा, तुमची कृपादृष्टी सर्वांवर अशीच अखंड राहू दे आणि सर्वांना धर्माचरण तसेच साधना करण्याची सुबुद्धी होऊ दे. व्यष्टी साधना आणि हिंदु राष्ट्राची स्थापना यांमध्ये येणारे स्थूल अन् सूक्ष्म स्तरांवरील अडथळे दूर होऊ दे', अशी तुमच्या चरणी प्रार्थना आहे.'

**संदर्भ : सनातन-निर्मित ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# परीक्षांच्या काळात भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या बेकायदेशीर प्रवेश आरोपाच्या बाबतीत गुन्हा दाखल करण्याच्या आदेशाला अखेर स्थगिती

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - औरंगाबाद दिनांक - २९ ऑगस्ट २०२५ रोजी (श्री. व्ही. के. पुरी ) ८ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद यांनी पोलीस निरीक्षक, हर्सल पोलीस ठाणे, औरंगाबाद. यांना क्रि.एम.ए.क्र. १८६६/२०२५ दिनांक १४.०८.२०२५ रोजी या न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशास मा. सत्र न्यायालय औरंगाबाद यांनी स्थगीती दिली आहे. या न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आपण तुर्तास कुठलेही कारवाई करु नये. मा. सत्र न्यायालय, औरंगाबाद यांनी क्रिमीनल रिव्हीजन क्रमांक १३९/२०२५ या प्रकरणात आदेश दिले.

१० वी व १२ वीच्या परीक्षांच्या काळात शाळेत बेकायदेशीर प्रवेश असा आरोप करणारे परिक्षा केंद्र प्रमुख गोपाळ जगन्नाथ जाधव हे २०१८ ते २०२२ पर्यंत शैक्षणिक व व्यावसायिक शिक्षण न घेताच बेकायदेशीर रित्या संस्था सचिव ऋषिकेश हिरालाल गतखणे व अध्यक्षा श्रीमती दुर्गा हिरालाल गतखणे यांच्या वरदहस्तामुळे मनम ानी बेकायदेशीर नियमबाह्यपणे शालेय प्रशासण चालवत होते तसेच शिक्षण विभागाने सदरील व्यक्तीला प्राचार्य या पदाची म ान्यता देखील दिलेली नाही असे असतांना श्री गोपाल जगन्नाथ जाधव हे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक ह्या तिन्ही शाळांचे कामकाज बेकायदेशीर रित्या करत आहेत. हे कोर्टाच्या लक्षात आणून दिल्यानंतर तसेच भरारी पथक शाळेवर गेले असता शाळेतील केंद्र संचालक व अपात्र प्राथमिक शाळेतील काही शिक्षक या ठिकाणी आढळून आले परीक्षेम ध्ये गैरप्रकार होत असल्याचे आढळून आल्यानंतर भरारी पथकाच्या प्रमुखांनी केंद्र संचालक श्री गोपाल जगन्नाथ जाधव व या संस्थे अंतर्गत अंशतः अनुदानीत प्राथमिक शाळेतील सह शिक्षक श्री योगेश मानसिंग राठोड, व श्री विलास उत्तम वैद तसेच इतर प्राथमिक शाळेतील सहशिक्षक श्री प्रसाद भरत महाडिक, श्री पोचिराम गोविंदराव गवळे, श्री सय्यद सरवर सय्यद मुनवर यांच्यावर हर्सल पोलीस स्टेशन येथे FIR NO ६१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली. हे जेव्हा भाई चंद्रकांत चव्हाण यांचे जेष्ठ विधिज्ञ वकील श्री तथागत कांबळे प्रशांत गिरी आणि यांनी माननीय कोर्टांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर भाई चंद्रकांत चव्हाण यांच्यावर चुकीच्या पद्धतीने हा खोटा गुन्हा दाखल होत आहे असे लक्षात आल्यानंतर माननीय कोर्टाने शिक्षक चळवळीतील भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या गुन्हा दाखल करण्याच्या आदेशावर स्थगिती देण्याचा निर्णय देऊन संस्था सचिव , अध्यक्ष व केंद्र संचालक यांच्या नियमबाह्य कारभारावर ताशेरे ओढले आहेत. भाई चंद्रकांत चव्हाण हे जिल्ह्याम ध्ये मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हा सचिव असून ते शिक्षकांना न्याय देण्यासाठी सतत कार्यशील आहेत तसेच या शाळेतील काही शिक्षकांनी भाई चंद्रकांत चव्हाण यांच्याकडे परीक्षा केंद्रावर होत असलेल्या गैरप्रकाराची माहिती दिलेली होती या कारणामुळेच चंद्रकांत चव्हाण यांनी भरारी पथकाला यासंदर्भात माहिती दिल्यानंतरच भरारी पथकाने येथे तात्काळ तपासणी करून येथील गैरप्रकार उघडकीस आणला होता याबाबतीत ला राग मनाशी धरून संस्था सचिव ऋषिकेश हिरालाल गतखणे, संस्था अध्यक्ष दुर्गा हिरालाल गतखणे व केंद्र संचालक गोपाळ जगन्नाथ जाधव यांनी द्वेष भावनेने कोर्टासमोर कोर्टाची दिशाभूल करून हा खोटा गुन्हा दाखल करण्यासाठी कोर्टात वयक्तिक केस दाखल केली. परिक्षा केंद्रावरील ही घटना २७ फेब्रुवारी २०२५ रोजी घडल्यानंतर ०३ दिवसांनी हर्सुल पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती या कारणानेच पोलिसांनी सदरील तक्रारीवर गुन्हा दाखल करून घेतला नाही कारण परीक्षा केंद्रावर पोलिसांचे पथक देखील उपस्थित असताना बेकायदेशीर व नियमबाह्यरित्या भाई चंद्रकांत चव्हाण यांनी कोणाच्या सांगण्यावरून प्रवेश केला हे पाहणे महत्त्वाचे होते कारण संस्था सचिव परीक्षा केंद्रावर उपस्थित होते व त्यांनीच भाई चंद्रकांत चव्हाण यांना शाळेम ध्ये शिक्षकांच्या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी बोलावलेले होते यामुळे भाई चंद्रकांत चव्हाण यांना खोट्या गुन्ह्यामध्ये अडकवण्याचे कटकारस्थान रचले गेले आहे हे जाणीवपूर्वक लक्षात येते. माननीय कोर्टाने या गुन्ह्यासंदर्भात सुनावणी साठी १६ सप्टेंबर २०२५ रोजी पुढची तारीख दिलेली आहे.यांनी माननीय कोर्टांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर भाई चंद्रकांत चव्हाण यांच्यावर चुकीच्या पद्धतीने हा खोटा गुन्हा दाखल होत आहे असे लक्षात आल्यानंतर माननीय कोर्टाने शिक्षक चळवळीतील भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या गुन्हा दाखल करण्याच्या आदेशावर स्थगिती देण्याचा निर्णय देऊन संस्था सचिव , अध्यक्ष व केंद्र संचालक यांच्या नियमबाह्य कारभारावर ताशेरे ओढले आहेत. भाई चंद्रकांत चव्हाण हे जिल्ह्याम ध्ये मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हा सचिव असून ते शिक्षकांना न्याय देण्यासाठी सतत कार्यशील आहेत तसेच या शाळेतील काही शिक्षकांनी भाई चंद्रकांत चव्हाण यांच्याकडे परीक्षा केंद्रावर होत असलेल्या गैरप्रकाराची माहिती दिलेली होती या कारणामुळेच चंद्रकांत चव्हाण यांनी भरारी पथकाला यासंदर्भात माहिती दिल्यानंतरच भरारी पथकाने येथे तात्काळ तपासणी करून येथील गैरप्रकार उघडकीस आणला होता याबाबतीत ला राग मनाशी धरून संस्था सचिव ऋषिकेश हिरालाल गतखणे, संस्था अध्यक्ष दुर्गा हिरालाल गतखणे व केंद्र संचालक गोपाळ जगन्नाथ जाधव यांनी द्वेष भावनेने कोर्टासमोर कोर्टाची दिशाभूल करून हा खोटा गुन्हा दाखल करण्यासाठी कोर्टात वयक्तिक केस दाखल केली. परिक्षा केंद्रावरील ही घटना २७ फेब्रुवारी २०२५ रोजी घडल्यानंतर ०३ दिवसांनी हर्सुल पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती या कारणानेच पोलिसांनी सदरील तक्रारीवर गुन्हा दाखल करून घेतला नाही कारण परीक्षा केंद्रावर पोलिसांचे पथक देखील उपस्थित असताना बेकायदेशीर व नियमबाह्यरित्या भाई चंद्रकांत चव्हाण यांनी कोणाच्या सांगण्यावरून प्रवेश केला हे पाहणे महत्त्वाचे होते कारण संस्था सचिव परीक्षा केंद्रावर उपस्थित होते व त्यांनीच भाई चंद्रकांत चव्हाण यांना शाळेम ध्ये शिक्षकांच्या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी बोलावलेले होते यामुळे भाई चंद्रकांत चव्हाण यांना खोट्या गुन्ह्यामध्ये अडकवण्याचे कटकारस्थान रचले गेले आहे हे जाणीवपूर्वक लक्षात येते. माननीय कोर्टाने या गुन्ह्यासंदर्भात सुनावणी साठी १६ सप्टेंबर २०२५ रोजी पुढची तारीख दिलेली आहे.

# भौतिक सुख हे खरे नाही, ते मृगजळावत आहे- डॉ प्रमोद कुमावत

विशाल देशमुख

**टेंभूर्णी** - सर्व प्राण्यांना सुखाची इच्छा आहे तशीच मानवाला सुद्धा सुखाची प्राप्ती व्हावी अशी इच्छा असून या सुखप्राप्ती करता तो आयुष्यभर पळत असतो. भौतिक सुविधांमुळे सुखाची प्राप्ती झाली असा अल्पकाळ भ्रम माणसाला होत असला तरी भौतिक प्रगती ही खऱ्या सुखाची व्याख्या नव्हे हे अध्यात्मात विचार केल्यावर कळते. खऱ्या सुखाची प्राप्ती व्हायची असेल तर संतांच्या संगतीमध्ये जावे लागते. संतांच्या संगतीतच खऱ्या सुखाची प्राप्ती होत असते असे प्रतिपादन परतुर येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या कीर्तन प्रसंगी डॉ प्रमोद महाराज कुमावत यांनी केले. गुरुवर्य बाबुराव महाराज सांगोळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. गुरुवर्य रंगनाथ महाराज परभणीकर गुरुजी यांचे बाबुराव महाराज सांगोळे हे शिष्य होते व आयुष्यभर त्यांनी वेदांत तत्वज्ञानाचा प्रसार व प्रचार केला. जगामध्ये प्रत्येक मनुष्य हा भौतिक सुखाच्या मागे लागला व भौतिक सुख हे मृगजळावत म्हणजे सुखाचा आभास आहे. जसे मोबाईल मधील विश्व हे आभासी आहे



खरे नाही तसे भौतिक सुख हे आभासी असून खरे नाही. आज मनुष्याकडे सर्व सुखवस्तू असूनही सुख नाही व संतांकडे भौतिक सुखवस्तू नसूनही ते सुखी व आनंदी दिसतात, याचे कारण वस्तूत सुख नसून भगवंतच सुखरूप आहे हे होय. म्हणून नामदेव महाराज संतांना जगाच्या कल्याणासाठी मोठे आयुष्य मागतात. अकल्प आयुष्य व्हावे तया कुळा, माझिया सकळा हरीच्या दासा, कल्पनेची बाधा नमो कोणे काळी, ही संत मंडळी सुखी असो, अहंकाराचा वारा न लागो राजसा, माझिया विष्णू दासा भाविकाशी, नामा म्हणे तयार असावे कल्याण, ज्या मुखी निधन पांडुरंग, या नाम देव महाराजांच्या अभंगावर ते निरूपण करत होते. जगाला लागलेली कल्पनेची बाधा संत काढीत असतात, जगाला लागलेला अहंकाराचा वारा संत काढीत असतात. दाही दिशांना ज्यांना हरीचे दर्शन होते त्यांना हरिदास असे म्हणतात. अशा हरिदासांना एक कल्प आयुष्य मिळावे व यांनी संपूर्ण जगाच्या कल्याणाकरता आपला देह झिजवावा अशी अपेक्षा संत नामदेव महाराज करतात. सर्व संतांनी देवाकडे संतांच्या संगतीचे मागणे मागितले आहे. तुकाराम महाराज म्हणतात म ागणे ते एक तुझं पाशी आहे देशील तरी पाहे पांडुरंगा, या संतांची निरवी हेची मज देई आणि तुझे काही न म ागू देवा. देवाकडे मागताना संतांची संगती संत मागत असतात. कारण संतांचे बोलणं हे जगाच्या कल्याणासाठीच असते आणि म्हणून खरे सुख हवे असेल तर संतांच्या संगती मध्ये आपण काळ घालवला पाहिजे असे बोलताना कुमावत महाराज म्हणाले. त्रिदिनिय कीर्तन सोहळ्यामध्ये पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा ह भ प डॉ वामनराव महाराज वैद्य यांची झाली तर काल्याचे कीर्तन हभप चांगदेव महाराज काकडे यांचे झाले.यावेळी हभप सागर महाराज चापाईतकर, ड महेश उफाड,गायणाचार्य भागवत महाराज, तुळशीदास महाराज,ईक्कर महाराज, कल्याण बागल सर,जगन वायाळ सर,म्हैसनवाड सर, जेईद महाराज आदी मंडळी उपस्थित होती. कीर्तन सोहळा यशस्वी करण्यासाठी विठ्ठल रखुमाई मंदिर संस्थानचे सर्व विश्वस्तांनी मेहनत घेतली. या सोहळ्यासाठी गावातील भाविक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

आमदार बाबनराव लोणगीकर यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

# मराठा आरक्षणावर ठोस आणि कायदेशीर पावले उचलण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी** - मराठा आरक्षणाच्या प्रलंबित प्रश्नावर राज्यात असंतोष वाढत असताना, विधानसभा सदस्य व माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्राद्वारे मराठा समाजाच्या मागण्यांना पाठिंबा दर्शवून तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची म ागणी केली आहे.



या पत्रात लोणीकर यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, म राठा समाज आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असून त्यांना आरक्षणाची गरज अत्यंत निकडीची आहे., आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाच्या चौकटीत ठामपणे मांडून स्थायी व कायदेशीर तोडगा काढण्याची जबाबदारी सरकारवर आहे., सरकारने यापूर्वी मराठा समाजासाठी सकारात्मक भूमिका घेतली असून यावेळेसही ठोस भूमिका घ्यावी.

लोणीकर यांनी पुढे म्हटले आहे की, सर्वसामान्य, गोर-गरिब, शेतकरी, कष्टकरी मराठा समाजाला आरक्षण मिळणे हे त्यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी अत्यावश्यक आहे. मी माझ्या पूर्ण क्षमतेने या मागणीस पाठिंबा देतो. सरकारने लवकरात लवकर सर्वोच्च न्यायालयीन लढ्यात प्रभावीपणे बाजू मांडून मराठा समाजाला न्याय द्यावा या पत्रामुळे राजकीय पातळीवर मोठी चर्चा सुरु झाली आहे. सध्या आझाद मैदानावर सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाने राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. अशा परिस्थितीत लोणीकर यांची ही मागणी महत्त्वाची ठरते कारण ते स्वतः परतूर मतदारसंघातील जनतेच्या भावना थेट पोहोचवत आहेत.

पक्षांतर्गत समीकरणे आणि आगामी महानगरपालिका तसेच विधानसभा निवडणुका लक्षात घेता, हे पत्र सरकारवर दबाव वाढवणारे पाऊल मानले जात आहे. ग्रामीण भागातील मराठा सम ाजाला वाटते की, या मागणीला कायदेशीर आणि न्यायालयीन पातळीवर अधिक ताकदीनं लढवणं गरजेचं आहे. आंदोलनादरम्यान सरकारकडून तातडीच्या घोषणा झाल्या तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याबद्दल नाराजी वाढत आहे.

लोणीकर यांचे पत्र हे केवळ औपचारिक पत्रव्यवहार नसून मराठा आरक्षणावर सरकारला जबाबदार ठरवणारा ठोस संदेश आहे. आगामी काही दिवसांत या विषयावर राजकीय हालचाली वेगवान होण्याची शक्यता असून, मराठा सम ाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सरकारने तातडीने कायदेशीर भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी वाढत आहे.

## पान १ वरुन

## वातावरण थंड ...

पाटील यांनी दिला आहे. वाशीत ठाण्यात सुरू असलेले प्रयोग थांबवा. अडवणूक करणाऱ्या पोलिसांना निलंबित करा असे जरांगे पाटील म्हणाले. ४० ते ५० पोलिसांनी गळ्यात रुमाल आणि टोपी घालून आमच्या गाड्या अडवत आहेत असेही जरांगे पाटील म्हणाले.

४० ते ५० पोलिसांनी गळ्यात रुमाल आणि टोपी घालून आमच्या गाड्या अडवत आहेत. भगवे रुमाल पोलिसांना घालायची वेळ येईल असं कधी वाटलं नाही असे जरांगे पाटील म्हणाले. महायुतीपासून मराठा समाज बाजूला गेला तर त्यांचा ग्रामपंचायतचा सदस्य देखील येणार नाही असे जरांगे पाटील म्हणाले. प्रत्येक वॉर्डात ४० तके ५० टक्के मतदान मराठा सम ाजाचे असल्याचे जरांगे म्हणाले. मराठ्यांची सरकारला गरज आहे. यावेळी जरांगे पाटील यांनी मंत्री नितेश राणे यांच्यावर देखील टीका केली. अंगावर एक पण केस नसलेले चिचुंदरी लाल दिसते. मी राणे साहेबांना निलेश साहेबांना काही बोललो का? नारायण राणे आणि निलेश साहेबांनी त्याला समजावून सांगाव, नाहीतर त्याला लाल करणार असा इशारा जरांगेंनी दिला आहे.

अभ्यासकांशी चर्चा केली आम्ही कोणतीही कागदपत्र देणार नाही. सरकारने १३ महिन्यांपूर्वी कागदपत्र घेतली असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. सातारा संस्थानचे आणि हैदराबाद संस्थानचे गॅझेटियरमध्ये संपूर्ण मराठवाडा बसतो. सातारा संस्थानाचे गाझेटियर मराठवाड्यातला मराठा कुणबी असल्याचं सांगतो असे जरांगे म्हणाले. सर्वोच्च न्यायालयात सरकारला अडथळा असणे शक्य नाही असेही जरांगे म्हणाले. ५८ लाख नोंदी आहेत. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत, ज्यांच्या नाही सापडल्या त्यांची पोट जात घ्या आणि अध्यादेश काढा असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. कुणबी ही उपजात आहे हेच कायदा सांगतो. ओबीसी पात्र करायचं असेल तर पोटजात उपजात म्हणून मराठा कुणबी म्हणून घ्या. सरसकट म्हणायची गरज नाही असे जरांगे म्हणाले.

## टेंभूर्णी फिडरवर...

व्यवसायिक व नागरिकांसह व्यापारी महासंघाने पुढाकार घेऊन उप कार्यकारी अभियंता जाफराबाद श्री मोहकर यांच्या सोबत फोनवर संपर्क साधून टेंभुर्णी येथील महावितरण कंपनीच्या ऑफिस मध्ये जाऊन येथील सहायक वीज अभियंता श्री सेप यांना निवेदन दिले आहे.

तर वरिष्ठाची परवानगी घेतल्याशिवाय आम्ही आमच्या स्तरावर टेंभुर्णी फिडरवर दुसऱ्या गावाचा लोड टाकन्याचा निर्णय घेणार नाही,अशी ग्वाही व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष अलकेश सोमाणी यांना दिली आहे.

## जलाशय संवर्धन ...

जलसंरक्षण मंचचे रमेशभाई पटेल, कुंडलिका - सीना पुनरूज्जीवन अभियानचे सुनील रायठठ्ठा यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी झालेल्या चर्चेत घाणेवाडी जलसंरक्षण मंचचे शिवरतन मुंदडा, कुंडलिका सीना फाउंडेशनचे उदय शिंदे, समस्त महाजन ट्रस्टचे सुरेश कुलकर्णी, जलसंधारण विभागाचे सेवानिवृत्त अभियंता रघुनाथ कल्याणकर, जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी, संजयकुमार दाड, उद्योजक अर्जुन गेही, जनविकास परिषदेचे मनोहर सरोदे, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटचे अध्यक्ष उमेश बजाज, सृष्टी फाउंडेशनचे संजय देशपांडे, जालना क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, सहकार भारतीचे अध्यक्ष सचिन वाणी, सीए अजित छाबडा, पर्यावरण प्रेमी आशिष पाठक, रोटरीच्या डॉ. प्रतिभा श्रीपत, शंभर शिक्षक सोशल क्लबचे राजेभाऊ मगर, अंजनी फाउंडेशनच्या विद्या जाधव, आय सी टी चा विद्यार्थी चैतन्य वराडे आदींनी सहभाग नोंदविला. बोगस पीआर कार्ड, खंडणीखोर आणि भूमाफियांचा बंदोबस्त करणे, नद्यांचा संरक्षणासाठी रेड आणि ब्लू लाईन मार्किंग, जालन्यातून नव्याने वंदे भारत ट्रेन, वाढते प्रदूषण, नाट्य आणि सांस्कृतिक चळवळ सुरू ठेवण्यासाठी मास्टर फुलंब्रीकर नाट्यगृह आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृहाचे नूतनीकरण आदी उपस्थित झालेल्या मुद्द्यांवर साधक- बाधक चर्चा झाली. उमेश बजाज यांनी नद्या संवर्धनसाठी ब्लू लाईन आणि रेड लाईनची मार्किंग करून मध्यभागी घनदाट वृक्ष लागवड करण्यात यावी, यासाठी रोटरी योगदान देण्यास तयार असल्याचे सांगितले. जलसंधारणचे सेवानिवृत्त अभियंता श्री. कल्याणकर यांनी घाणेवाडी जलाशय कुठल्याही क्षणी फुटू शकते, अशी भीती व्यक्त करून, या तलावाची उंची सहा मीटरने घटल्याचे तसेच सांडव्याची उंचीही कमी झाल्याचे सांगितले. सांडव्याची दुरावस्था भयावह असून ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यास तलाव टिकेल, याची शाश्वती नसल्याचे सांगितले.

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर खा. काळे म्हणाले की, सामाजिक संस्था म्हणून आपण या सर्व कार्यामध्ये सातत्यपूर्ण योगदान देत आहात. चर्चेमधून बरेच काही माहिती झाले. वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर जाऊन पाठपुरावा करावा लागणार आहे. त्या दृष्टीने अशा प्रकारच्या बैठका सातत्याने घेतल्या जातील. आज फक्त घाणेवाडी संवर्धन आणि नद्या संवर्धनावर चर्चा झाली. आरोग्य, शिक्षण आणि कृषी या विषयावर त्या त्या विभागातील प्रमुखांसोबत वेगळी बैठक घेतली जाईल. उध्वस्त झालेल्या सांडव्यांमुळे घाणेवाडी तलाव केव्हाही फुटून मोठ्या हानीची भीती सर्वांनीच व्यक्त केली आहे. त्यामुळे विलंब न लावता तातडीने मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. जनसहभागातूनच परिवर्तन घडवून आणता येईल, असा ठाम विश्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उदय शिंदे यांनी केले. शेवटी खा. काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**शासन पातळीवर डीपीआरचे काम व्हायला हवे-राजेंद्र बारवाले**

जनतेचे सहकार्य, शासकीय यंत्रणा आणि राजाश्रय असेल तर काहीच अशक्य नाही. घाणेवाडी संदर्भात खा. डॉ. कल्याण काळे यांनी पुढाकार घेऊन सर्वांची मते आजच्या परिसंवादात जाणून घेतली, ही सकारात्मक बाब आहे. एका बैठकीवर काहीच होणार नाही, त्यासाठी बैठकांचे निश्चित तारखांचे वेळापत्रक ठरवावे. घाणेवाडीवर दहा वर्षापासून जलसंरक्षण मंचच्या माध्यमातून लोकसभागातून काम सुरू आहे. शासनाचे यासाठी सहकार्य मिळो अथवा न मिळो; पण शासनाने काम अडवले नाही, ही सकारात्मक गोष्ट आहे. घाणेवाडी दुरुस्ती आणि नद्या संवर्धनाचे काम मार्गी लावण्यासाठी डीपीआर तयार होणे आवश्यक असून, खा. काळे यांनी याचे नेतृत्व स्वीकारावे आणि काम तडीस नावे, जालनेकर तुम्हाला काही कमी पडू देणार नाही, अशी साद त्यांनी घातली.

**सांडव्याची दुरुस्ती न झाल्यास मोठा धोका - रमेशभाई पटेल***

भाईश्री रमेशभाई पटेल म्हणाले की, पूर्वी महिन्याला एकदा नळ येत होते. म्हणजेच तीव्र पाणीटंचाई होती. त्या अनुषंगाने जालनेकर पाण्यासाठी अवलंबून असलेल्या घाणेवाडी जलाशयातील गाळ उपसा करण्याचे काम सन २०१० पासून सुरू झाले. प्रशासनाकडून एक पोकलेन मिळाला होता. नंतर आम्ही देखील पोकलेन लावले. उद्योजक, व्यापारी जनतेचाही सहभाग वाढला. मागच्या वर्षी ५ लाख ट्रॅक्टर गाळ उपसण्यात आला. आतापर्यंत सुमारे १० लाख ट्रॅक्टर गाळ उपसण्यात आला आहे. यावर्षी तलाव ओसंडून वाहत आहे. मात्र, सांडव्याला गळती लागली आहे. योग्य वेळी दुरुस्ती न झाल्यास मोठे नुकसान होऊ शकते. यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या सहकार्याची गरज आहे. हे काम एकट्या सामाजिक संस्था करू शकत नाहीत, असे ते म्हणाले.

**मूळ समस्या घाणेवाडी कुणाच्या मालकीची?- सुनीलभाई रायठठ्ठा**

याप्रसंगी सुनीलभाई रायठठ्ठा म्हणाले की, ना जलवाहिनी फ ुटण्याची भीती, ना वीजपुरवठ्याची गरज यामुळे घाणेवाडी जलाशयाकडे जालनेकरांनी कधीच लक्ष दिले नाही. मुख्य समस्या म्हणजे हा तलाव कुणाच्याही मालकीचा नाही. महानगरपालिका फक्त यूजर आहे. कुणाची मालकी नसल्याने अतिक्रमणे वाढली आहेत. महापालिकेकडे दुरुस्तीची तांत्रिक क्षमता नाही. ही बाब विचारात घेता इंजीनियरिंगची क्षमता असलेल्यांकडेच हा तलाव हस्तांतरित होणे गरजेचे आहे. याबाबत आम्ही जलसंधारण विभागाच्या अभियंत्याला भेटलो. ते जबाबदारी घ्यायला तयार आहेत मात्र त्यासाठी हस्तांतर महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र शासनाने कुंडलिका - सीना नदी संवर्धन प्रकल्प हाती घ्यावा, अशी विनंती करून याबाबतचा डीपीआर आम्ही तयार केलेला आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

# सरकार फक्त आश्वासनांवरच मराठा समाजाला खेळवत आहे - तय्यब देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** मराठा आरक्षणाच्या मागणीने पुन्हा एकदा राज्यातील राजकीय वातावरण तापवले आहे. जालना शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे शहर उपाध्यक्ष तैय्यब बापु देशमुख यांनी राज्यातील भाजप सरकार आणि त्यांच्या सहयोगी पक्षांवर मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर जाणूनबुजून खेळ केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, आज संपूर्ण महाराष्ट्रात मराठा समाज आरक्षणासाठी रस्त्यावर उतरला आहे. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाने २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर आपला मोर्चा उभारला आहे, मात्र सरकार या आंदोलनाकडे गंभीरतेने पाहत नाही. संविधानाने दिलेले अधिकार वापरून समाज आपला हक्क मागत आहे, परंतु सरकार फक्त आश्वासनांवरच समाजाला खेळवत आहे.

आझाद मैदानावर हजारो आंदोलनकरी ग्रामीण भागातून आले आहेत, जे कधीच मुंबईला गेले नव्हते. त्यांच्या मूलभूत सोयीसुविधांची जबाबदारी राज्य सरकारवर असूनही आंदोलनकऱ्यांना पिण्याचे पाणी आणि जेवण मिळण्यात अडचणी निर्माण झाल्याची तक्रार करण्यात आली आहे.



देशमुख यांच्या मते, एका आंदोलनकऱ्याने सांगितले की, आम्हाला फक्त भगवा रुमाल दिसतो म्हणून पाणी नाकारले जात आहे. दुकानदारांवर भाजप नेत्यांच्या दबावाचे आदेश आहेत.

२०१४ पासून हिंदुत्ववादी राजकारणाच्या जोरावर सत्तेत आलेल्या भाजपवर देशमुख यांनी हिंदुत्वाच्या नावावर फक्त जनतेला फसवल्याचा आरोप केला.
हिंदू जनतेच्या नावाने सत्ता मिळवून आज हिंदूंच्याच हक्काकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. फडणवीस सरकारने शिंदे समिती स्थापन केली, पण त्यातून आजपर्यंत ठोस निर्णय निघाला नाही. हेच खेळ मुस्लिम समाजालाही अनुभवायला मिळाले होते - श्रीकृष्ण आयोग, रंगनाथ मिश्रा आयोग, अबुबरहेमान आयोग स्थापन झाले, पण मुस्लिम समाजालाही आजतागायत आरक्षण मिळालेले नाही, असे ते म्हणाले.

या आंदोलनात सर्वात लक्षणीय बाब म्हणजे मुस्लिम समाजाने दाखवलेली सामाजिक एकात्मता. आझाद मैदानावर आंदोलनकऱ्यांना पाणी, अन्न आणि इतर सोयी पुरवणाऱ्या बहुसंख्य लोकांमध्ये मुस्लिम बांधव आघाडीवर आहेत. देशमुख यांनी यावर भाष्य करताना सांगितले, मुस्लिम समाज गरीब असो किंवा श्रीमंत, संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करतो. आजही मुस्लिम समाज आपली जबाबदारी ओळखून मराठा समाजाच्या सोबत खंबीरपणे उभा आहे. याउलट, ज्यांनी हिंदुत्वाच्या नावावर सत्ता मिळवली - बजरंग दल, विश्व हिंदू परिषद किंवा संघ परिवार - हे कोणतेही संघटन आझाद मैदानावर मदतीसाठी पोहोचलेले नाही.

राजकीय जाणकारांच्या मते, या आंदोलनाचा परिणाम आगामी महाराष्ट्र विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांवर मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील मराठा समाजाची असंतोषाची लाट सरकारसाठी धोक्याची घंटा ठरू शकते.
मराठा समाजातील एक मराठा, लाख मराठा हा नारा पुन्हा जोर धरताना दिसत आहे, ज्यामुळे सरकारवर लवकरात लवकर ठोस निर्णय घेण्याचा दबाव वाढत आहे.

# रोहित भुरेवाल यांच्या हस्ते काद्राबादच्या सम्राटची आरती, महासंघाच्या अध्यक्षांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष रोहित भुरेवाल यांच्या हस्ते काद्राबाद येथील श्री श्रेय गणेश 'काद्राबादचा सम्राट' यांची आरती उत्साहात पार पडली. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष यशराज जोडीवाले यांनी शाल देऊन व पुष्पगुच्छ देऊन श्री. भुरेवाल यांचा सत्कार केला.

या कार्यक्रमात मंडळाचे पदाधिकारी पप्पू खडके यांनी शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांचाही सत्कार केला. या कार्यक्रमाला आदित्य मालोदे, भावेश भुरेवाल, हर्ष जोडीवाले, हर्ष परदेशी, ओम खडके, कार्तिक सुरासे, अक्षय मिसाळ, तनुज मिसाळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# परतूर मंठा तालुक्यातील एकल महिलांशी संवाद कार्यक्रम संपन्न

**परतुर । प्रतिनिधी -** कोरोना महामारी नंतर आज समाजा मध्ये खुप मोठ्या प्रमाणावर एकल महिलाची संख्या वाढलेली आहे त्यातच एकल महिलाचे प्रश्न खुप मोठे आहे यामध्ये संपत्ती वाद शासकीय योजना पासुन वंचीत एकल महिला म्हणुन समाजात वावरताना विविध अडचणी चा सामना करावा लागतो याचे अभ्यास करून जेष्ठ अभ्यासक लेखक व समजिक कार्यकर्त आदरणीय मा हेरंब कुलकर्णी यानी महाराष्ट्र राज्यात साऊ एकल महिला संस्था महाराष्ट्र राज्य संस्थापन करूण एकल महिलाचे संघटन उभे केले त्याना उद्योग व्यवसाय साठी शेळी दिले नंतर एकल महिलाच्या मुलासाठी शैक्षणिक



सहित्य वाटप करण्यात आले आहे अशा विविध प्रश्नाला घेउन मा हेरंब कुलकर्णी हे एकल महिला संवाद करून प्रश्न अडचणी समजावुन घेत आहेत.
मंठा परतुर तालुक्यातील एकल महिलशी संवाद कार्यक्रम स्नेहांकुर मापेगाव पुर्नवसन येथे संप्ना झाला या साउ समितीच्या माध्यमातून जालना जिल्हातील वंचित दुर्लक्षित एकल महिला विधवा घटस्फोटीत अशा विविध घटकातील महिलांना सर न्याय मिळवून देतात,या महिलांना उद्योग कसे करता येईल या संदर्भात सरांची खूप मोठी चळवळ देखील चालू आहे.या कार्यक्रमाला उपस्थित हेरंब कुलकर्णी ( साउ एकल महिल समिती) एकनाथ राऊत (अध्यक्ष बालकल्याण समिती जालना,) एकनाथ कदम .(अध्यक्ष आनंद प्राथमिक व माध्यमिक विद्यालय परतुर), श्रीमती मनीषा रमेश सोळंके मॅडम प्रदीप कातारे निता कातारे व परतूर मंठा तालुक्यातील एखल महिला उपस्थित होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.